
ePaper
# नव्या सरकारला एसटीचा विसर? प्रवाशांकडून संतप्त सवाल



|वर्ष - 6 | अंक - 190 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




www.mahaenews.com | शनिवार | दिनांक 22ऑक्टोबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## उच्च न्यायालयाने प्रशासनाला निर्देश : दि. 29 नोव्हेंबरपर्यंत म्हणणे सादर करा

# पाणी प्रश्न कोर्टाच्या दारात !



**| पिंपरी | महाईन्यूज |**

**महापालिका हद्दीतील शहरी भागात राहणाऱ्या नागरिकांना भेडसावणाऱ्या पाणीप्रश्नावर नागरी कृती समित्यांनी संयुक्तरीत्या मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. याची दखल घेत उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने पाणी प्रश्नांची दखल घेत प्रतिवादी असलेल्या पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकांसह इतरांना नोटिसा बजावल्या आहेत. दि. २९ नोव्हेंबर २०२२ पर्यंत त्यांचे म्हणणे सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. उच्च न्यायालयातील न्यायाधीश एस. व्ही. गंगापूरवाला आणि आर. एन. लद्धा यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर या जनहित याचिकेची सुनावणी झाली.**

पुणे आणि पिंपरी- चिंचवड महापालिका हद्दीत राहणाऱ्या नागरिकांना पिण्याचे पाणी विकत घ्यावे लागत आहे. शहरातील सोसायट्या दरवर्षी कोट्यवधी रुपये पाण्यासाठी खर्च करत आहेत. खासगी पाणीपुरवठा करणाऱ्या स्त्रोताचे पाणी हे पिण्यायोग्य आहे का? याची तपासणी करणारीयंत्रणाच उपलब्ध नाही. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. बांधकाम ठेकेदार, टँकरमालक यांच्याकडून समांतर पाणी वितरणव्यवस्था चालविली जात असल्याचेही याचिकाकर्त्यांनी नमूद केले आहे.

वाघोली गृहनिर्माण संस्था रमालक असोसिएशन, पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट फेडरेशन, अखिल भारतीय ग्राहक पंचायत, पिंपरी-चिंचवड सहकारी गृहनिर्माण कल्याण संस्था फेडरेशन, बाणेर पाषाण लिंक रोड वेल्फेअर ट्रस्ट, बालेवाडी रेसिडेन्सी सहकारी हॉसिंग वेल्फेअर लि., बावधन सिटिझन पालिका फोरम, औध विकास मंडळ आणि रू शकत असोसिएशन ऑफ नगर रोड सिटिझन्स नागरी फोरम यांनी संयुक्तरीत्या ही जनहित याचिका दाखल केली आहे.

### धरणे भरली तरीही पाणी मिळेना...

**पुणे जिल्ह्यातील सर्व धरणे १०० टक्के भरली आहेत. तरीदेखील पुणे आणि पिंपरी -चिंचवड महापालिका नागरिकांपर्यंत पाणी पोहोच करू शकत नाही.**

**केंद्रीय गृहनिर्माण व नागरी व्यवहार मंत्रालयाने दिलेल्या मानकानुसार शहरी भागात दररोज प्रतिमाणसी १३५ लिटर वापराचे पाणी आवश्यक असताना गृहनिर्माण संस्थांमध्ये अवघे २० लिटर पाणी उपलब्ध होत आहे. खासगी टँकरच्या खराब पाण्याचा नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचे याचिकाकर्त्यांचे वकील सत्या वकील यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.**

# मनपा वि नेमबाजीसाठी थेरगाव शाळा "रोल मॉडेल स्कूल" होणार !

## माजी नगमाजी नगरसेवक शंकर जगताप यांची सूचना : महापालिका प्रशासनाकडून कार्यवाहीची अपेक्षा

**| पिंपरी | महाईन्यूज |**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या थेरगाव येथील माध्यमिक शाळेत विद्यार्थ्यांना रायफल शुटिंगचे प्रशिक्षण देण्यासाठी थेरगाव रायफल ट्रेनिंग सेंटर सुरू करण्यात आले आहे. भाजपचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख व माजी नगरसेवक शंकर जगताप यांनी या ट्रेनिंग सेंटरला भेट देऊन पाहणी केली. हे ट्रेनिंग सेंटर म्हणजे महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांना नेमबाजीचे प्रशिक्षण देणारे शहरातील "रोल मॉडेल स्कूल" म्हणून विकसित करावे. महापालिका शाळांमधील गोरगरीब विद्यार्थी नेमबाजीत तरबेज होऊन आंतरराष्ट्रीय नेमबाज म्हणून नावारूपाला यावेत यासाठी तेथे सर्व अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी शंकर जगताप यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे केली आहे.

महापालिकेच्या थेरगाव येथील माध्यमिक शाळेत रायफल ट्रेनिंग सेंटर सुरू आहे. शाळेच्या शिक्षकांनी माजी नगरसेवक अभिषेक बारणे यांच्या मदतीने महापालिका शाळांतील विद्यार्थ्यांना नेमबाजीचे मोफत प्रशिक्षण देण्यासाठी हे ट्रेनिंग सेंटर सुरू केले आहे. पार्किंगची जागा बंदिस्त करून हे सेंटर उभारले आहे. रायफल शूटिंगसाठी शिक्षकांनी टाकाऊ वस्तूंचा वापर केला आहे. याठिकाणी १० मीटर रायफल शुटिंगचे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. शाळेचे मुख्याध्यापक चंद्रशेखर कदम व माजी नगरसेवक अभिषेक बारणे यांनी स्वखर्चाने दोन रायफल दिले आहेत. तसेच पोलिस आयुक्त कार्यालयाने एक रायफल दिले आहे. तीन रायफलीच्या माध्यमातून महापालिका शाळेतील विद्यार्थी नेमबाजीचे धडे गिरवत आहेत. यावेळी शिक्षण मंडळाच्या माजी सभापती मनिषा पवार, माजी नगरसेवक अभिषेक बारणे, सिद्धेश्वर बारणे, माजी प्रभाग स्वीकृत सदस्य संदीप गाडे, सामाजिक कार्यकर्ते



काळूराम बारणे, तानाजी बारणे, सनी बारणे, शाळेचे मुख्याध्यापक चंद्रशेखर कदम, प्रशिक्षक व नेमबाजीतील राष्ट्रीय सुवर्णपदक विजेते विजय रणझुंजारे, शिक्षक कृष्णराव टकले, बन्सी आटवे, ए. व्ही. फुगे, ए. एस. चौगुले, छत्रपती पुरस्कार प्राप्त सोनाली पाटील, राष्ट्रीय खेळाडू सोनाली जाधव आदी उपस्थित होते.

### थेरगाव रायफल ट्रेनिंग सेंटरमध्ये सुविधा द्या...

पाहणीनंतर शंकर जगताप यांनी थेरगाव रायफल ट्रेनिंग सेंटर हे नेमबाजी प्रशिक्षणाचे शहरातील "रोल मॉडेल स्कूल" म्हणून विकसित व्हावे, अशी मागणी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे केली आहे. भारताने अनेक आंतरराष्ट्रीय नेमबाज घडवले आहेत. नेमबाजीत भारतीय खेळाडूंनी ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक प्राप्त केले आहेत. नेमबाजीला मिळालेले जागतिक वलय पाहता पिंपरी-चिंचवड शहरातूनही आंतराष्ट्रीय नेमबाज तयार करण्याच्या उद्देशाने थेरगाव रायफल ट्रेनिंग सेंटर उपयुक्त ठरेल. महापालिका शाळांमध्ये अनेक नेमबाज शिक्षण घेत आहेत. या नेमबाजांना चांगले आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण मिळावे यासाठी थेरगाव रायफल ट्रेनिंग सेंटरमध्ये सर्व अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी शंकर जगताप यांनी आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे केली आहे.

# मनसेचेही 'मिशन बारामती'!

## राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांचा राज ठाकरेंच्या उपस्थितीत पक्षप्रवेश

।पुणे।
।महाईन्यूज।प्रतिनिधी।




राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या बारामती लोकसभा मतदारसंघाला भाजपनंतर आता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडूनही लक्ष्य केले आहे. त्यानुसार बारामती लोकसभा मतदारसंघातील काही कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेमध्ये प्रवेश केला. शहराशी संलग्न भागातील हे कार्यकर्ते असून त्यांच्या पक्षप्रवेशामुळे मनसेला आगामी महापालिका निवडणुकीत फायदा होईल, असा दावा मनसे पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आला आहे.महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या उपस्थितीत जोरदार शक्तिप्रदर्शन करत पक्ष प्रवेश झाला. मनसेचे माजी शहराध्यक्ष वसंत मोरे यांच्या पुढाकारातून पक्षप्रवेश करण्यात आले.

आगामी लोकसभेची निवडणूक अडीच वर्षानंतर होणार आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून मावळ, बारामती आणि शिरूर लोकसभा मतदारसंघासाठी निरीक्षकांची नियुक्ती काही दिवसांपूर्वी करण्यात आली होती. बारामती लोकसभा मतदारसंघाची जबाबदारी वसंत मोरे यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. त्यानुसार बारामती लोकसभा मतदारसंघात असलेला मात्र शहरी भागाशी संलग्न असलेल्या भागावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. त्यानुसार खडकवासला, वारजे, नऱ्हे-आंबेगाव भागातील कार्यकर्त्यांचा पक्ष प्रवेश करण्यात आला.

छावा संघटनेचे आप्पा आखाडे, नऱ्हे-आंबेगाव परिसरातील समीर कुटे, भोर तालुक्यातील केळवडे गावातील रोहित वाल्हेकर, वारजे परिसरातील संदीप तांगुदे यांनी मनसेत प्रवेश केला. हे सर्व कार्यकर्ते ताकदीचे असून त्याचा बारामती लोकसभा निवडणुकीबरोबरच आगामी महापालिका निवडणुकीत मनसेला निश्चित फायदा होईल, असा दावा वसंत मोरे यांनी केला. दरम्यान, मनसे सरचिटणीस हेमंत संभूस यांची महाराष्ट्र नवनिर्माण जनाधिकार सेनेच्या राज्य अध्यक्षपदी आणि संतोष दासवडकर यांची भोर-वेल्हा-मुळशी जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली.

# पावसात वीज बिघाड, नागरिक हैराण

## सुरळीत विजेसाठी महावितरण कर्मचाऱ्यांची पळापळ

।पुणे। महाईन्यूज ।



पावसामुळे दिवाळीच्या तोंडावर विविध भागांत पाणी साचल्याने किंवा इतर तांत्रिक कारणांनी वीज यंत्रणेमध्ये बिघाड होण्याचे सत्र गेल्या काही दिवसांपासून कायम आहे. रात्र अंधारात काढावी लागल्याने नागरिक हैराण झाले. गेल्या दोन दिवसांतही शहरात तांत्रिक बिघाडाच्या विविध घटना घडल्या. दुरुस्तीची कामे पूर्ण करून वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी महावितरणच्या कर्मचाऱ्यांची चांगलीच पळापळ झाली. गुरुवारी संध्याकाळनंतर वीजवाहिन्यांतील बिघाडामुळे कात्रज-कोंढवा परिसर आणि महापारेषणच्या वीजकेंद्रातील बिघाडामुळे खडकी-बोपोडी-दापोडी आदी भागातील ग्राहकांना फटका बसला. दुरुस्तीची कामे करून शुक्रवारी टप्प्याटप्प्याने वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला. कात्रज कोंढवा परिसरातील पाऊस आणि साचलेल्या पाण्यामुळे दोन भूमिगत वीजवाहिन्यांमध्ये गुरुवारी सायंकाळी बिघाड झाला. या दोन्ही भूमिगत वाहिन्यांमध्ये एकमेकांना पर्यायी स्वरूपात वीजपुरवठा करण्याची सोय आहे. मात्र, दोन्ही वाहिन्या नादुरुस्त झाल्याने समस्येत भर पडली. महावितरणचे अभियंते आणि कर्मचाऱ्यांनी तांत्रिक कामे करून वीजपुरवठ्याची पर्यायी सोय केली. यामध्ये कात्रज-कोंढवा २२ केव्ही वाहिनीवरील सर्व परिसराचा वीजपुरवठा भिलारेवाडी वीजवाहिनीद्वारे सुरू करण्यात आला. मात्र गोकुळनगर, शिवशंभो गल्ली क्र. २ ते ४, पॅरामाउंट गार्डन, पॅरामाउंट इरोस, माउलीनगर, समर्थनगर, राजमाता कॉलनी, आंबेडकरनगर, टिळेकरनगर या परिसरातील सुमारे २२०० ग्राहकांचा

### 22 तास वीजबंद, पर्यायी व्यवस्था नाही...

**खडकी येथील उपकेंद्रात गुरुवारी संध्याकाळी मोठा बिघाड झाल्याने खडकीपासून बोपोडी, पुणे-मुंबई महामार्ग आणि दापोडीतील वीजपुरवठा खंडित झाला. दुरुस्तीनंतर मध्यरात्री काही भागांत वीज आली, पण एकापाठोपाठ एक वाहिन्यांमध्ये आर्द्रतेमुळे बिघाड निर्माण झाला. दापोडी नेहरू चौकात अतिक्रमणांच्या विळख्यात सापडलेल्या पिलरमध्ये मोठा बिघाड झाला. रात्रभर या सर्वांची दुरुस्ती झाली. पण, काही भागांतच वीज आली. पुन्हा सकाळपासून कामे करून दापोडीतील गणेशनगर, आनंदवन, सुंदरबाग आदी भागातील वीज २२ तासांनंतर शुक्रवारी दुपारी साडेतीननंतर पूर्ववत होऊ शकली. या भागाला पर्यायी व्यवस्थेतून वीजपुरवठा करण्याची महावितरणची कोणतीही यंत्रणा नसल्याचा मुद्दाही पुन्हा समोर आला.**

# मुळशी-मुंबई मार्गाचे काम एक महिन्यात मार्गी लागणार

## उच्च न्यायालयाची भूसंपादनाला परवानगी



।पुणे। महाईन्यूज ।

एन.डी.ए. चौक (चांदणी चौक) उड्डाणपूल प्रकल्पातील मुळशी-मुंबई मार्गाच्या उर्वरित भूसंपादनाचा मार्ग मोकळा झाला आहे. या प्रकरणी दाखल प्रकरणात उच्च न्यायालयाने भूसंपादनाला परवानगी दिली असल्याने या ठिकाणचे उर्वरित काम पुढील एक महिन्यात पूर्ण होईल. त्यामुळे मुळशीकडून मुंबई कडे जाणारी वाहतूक सुरळीत होईल, असा दावा भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून (नॅशनल हायवेज ऑथॉरिटी ऑफ इंडिया – एनएचएआय) गुरुवारी करण्यात आला. मुळशी-मुंबई मार्गिकेचे काम पुणे महानगर पालिकेकडून पूर्ण झाले नव्हते. भूसंपादन अधिकाऱ्यांनी केलेल्या निवाड्याविरोधात बाधित मालमत्ताधारकांनी उच्च न्यायालयात दाद मागितली होती. उच्च न्यायालयाने उर्वरित भूसंपादनाचे काम करण्यास परवानगी दिली आहे. या निर्णयामुळे उर्वरित काम एक महिन्यात पूर्ण होणार आहे. चांदणी चौकातील जुना पूल पाडल्यामुळे सध्या सेवा रस्ता आणि इतर कामासाठी दोन्ही बाजूकडील खडकांचे खोदकाम प्रगतीत आहे. सद्य:स्थिती पुलाच्या ठिकाणी मुंबई-सातारा पाच मार्गिका आणि सातारा-मुंबईसाठी तीन मार्गिका अशा मार्गिका वाहतुकीसाठी उपलब्ध झाल्या आहेत.

वेदभवन समोरील सेवा रस्त्याचे काम बऱ्याच दिवसापासून बंद असल्याने वाहतुकीला अडचणी येत होत्या. सध्या हे प्रकरण न्यायालयात असल्याने अस्तित्वात असलेल्या सेवा रस्त्याच्या भरावाचे काम करण्यात आले असून उर्वरित रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले आहे. बेंगळूरु-मुंबई महामार्गावरील सद्य:स्थितीतील चौपदरी रस्त्याचे सहापदरीकरण करण्यासाठीचे सीमाभिंत आणि माती भरावाचे काम ८० टक्के पूर्ण झाले आहे. उर्वरित काम १५ दिवसात पूर्ण करण्याचे नियोजन आहे, अशी माहिती एनएचएआयचे प्रकल्प संचालक एस. एस. कदम यांनी दिली.

दरम्यान, श्रृंगेरी मठाच्या जागेचा ताबा १ सप्टेंबरला पुणे महानगरपालिकेकडून मिळाला असून सेवा रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे.

# कात्रजमध्ये इमारतीच्या चौथ्या मजल्यावरून पडून बांधकाम मजूर मृत्युमुखी

। पिंपरी । । महाईन्यूज ।

नियोजित गृहप्रकल्पात चौथ्या मजल्यावर काम करणारा बांधकाम मजूर लाकडी पहाड (सांगाडा) तुटून पडल्याने मृत्युमुखी पडल्याची घटना कात्रज भागात घडली. दुर्घटनेस जबाबदार असल्या प्रकरणी भारती विद्यापीठ पोलिसांनी ठेकेदारासह बांधकाम व्यावसायिकाच्या विरोधात गुन्हा दाखल केला.शहरामध्ये गर्दीच्या ठिकाणी वाहतूक कोंडी होत आहे. गर्दीच्या ठिकाणी अवजड वाहतुकीस बंदी आहे. मात्र त्यानंतरही अवजड वाहने शहरात येत आहेत. तसेच बस, रिक्षा त्यांच्या थांब्या व्यतिरिक्त अन्य ठिकाणी थांबत आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडीत भर पडत आहे.

वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी ठोस उपाययोजना कराव्या लागणार आहेत. त्यानुसार अवजड वाहने शहरात प्रवेश करताना त्यांना वाहतूक पोलिसांनी अटकाव करावा आणि बस, रिक्षा यांना योग्य त्या ठिकाणी थांबे देण्याबाबतचे नियोजन करावे, अशी मागणी पत्राद्वारे महापालिका प्रशासनाकडून वाहतूक पोलिसांकडे करण्यात आली आहे. धाकिया किसन देगावत (वय ३५, सध्या रा. नवाजीश पार्क, कोंढवा) असे मृत्युमुखी पडलेल्या बांधकाम मजुराचे नाव आहे. मजुराच्या सुरक्षेची काळजी न घेता दुर्घटनेस जबाबदार असल्या प्रकरणी ठेकेदार तसेच बांधकाम व्यावसायिकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# पिंपरी-चिंचवडमधील सोसायटीधारकांना ‘दिवाळी गिफ्ट’!

## ‘ओला कचरा’बाबत चिंता मिटली : पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या प्रशासनाला सूचना



**पिंपरी।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवडमधील सोसायटींमध्ये निर्माण होणाऱ्या ओला कचरा विल्हेवाट लावण्याबाबत महापालिका प्रशासनाने बंधनकारक केले होते. मात्र, सोसायटीधारकांच्या भावनांचा विचार करुन ओला कचरा संकलित करण्याबाबत प्रशासनाची कार्यवाही ‘जैसे थे’ ठेवण्यात यावी. नवीन बांधकाम प्रकल्पांना ओला कचरा प्रक्रिया प्रकल्प बंधनकारक करण्यात यावेत. तसेच, ओला कचरा संकलन आणि विल्हेवाट याबाबत ठोस धोरण ठरवण्याबाबत समिती स्थापन करण्यात येईल, असा निर्णय राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले आहे.**

पिंपरी-चिंचवड महापालिका मुख्यालय येथे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी आढावा बैठक घेतली. यावेळी माजी खासदार अमर साबळे, भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे, आमदार उमाताई खापरे, चिंचवड विधानसभा निवडणूक प्रभारी शंकर जगताप, माजी सत्तारुढ पक्षनेते एकनाथ पवार, नामदेव ढाके, महापालिका प्रशासक व आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ, प्रदीप जांभळे-पाटील, उल्हास जगताप यांच्यासह प्रमुख अधिकारी, पदाधिकारी उपस्थित होते.

दरम्यान, चंद्रकांत पाटील यांनी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय आणि पुणे महानगर प्रदेश विकास महामंडळाच्या मुख्यालयांना भेट दिली. तसेच, कामकाजाचा आढावा घेतला.

चंद्रकांत पाटील म्हणाले की, २०१७ मध्ये केंद्रीय पातळीवर निर्णय झाला असला, तरी त्याची अंमलबजावनी करण्यात आली नव्हती. मग, आणखी काही दिवस ओला कचरा उचलण्यात यावा. प्रतिदिन १०० किलोपेक्षा अधिक ओला कचरा निर्माण होणाऱ्या पिंपरी-चिंचवडमधील गृहनिर्माण सोसायट्यांना त्या कचऱ्यावर प्रक्रिया करणारे प्रकल्प सोसायट्यांनीच उभारण्याचा आणि अशा सोसायट्यांचा ओला कचरा दि. १ नोव्हेंबरपासून न उचलण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, या निर्णयाला तूर्त स्थगित करण्याची सूचना करण्यात आली आहे. तसेच, नागरिकांच्या भावना लक्षात घेता कोणतीही घाई न करता या निर्णयाची व्यवहार्यता तपासण्यासाठी नागरिक आणि अधिकाऱ्यांचा समावेश असलेली एक समिती स्थापन करण्याबाबत सूचना केल्या आहेत.

### सोसायटी फेडरेशनच्या मागणीला अखेर यश

चिखली –मोशी- चऱ्होली पिंपरी-चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेशनने ओला कचरा न उचलण्याच्या निर्णयाला कडाडून विरोध केला होता. फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी कचरा उचलला नाही, तर महापालिका आवारात कचरा फेकू... असा इशाराही दिला होता. त्यानंतर आमदार महेश लांडगे यांनी मध्यस्थी करीत सोसायटीधारकांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला. याबाबत राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन देण्यात आले. त्यानंतर पालकमंत्र्यांच्या अधिकारात निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन शहरवासीयांना मिळाले होते. अखेर पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी शहराच्या भेटीवर असताना सोसायटीधारकांचा कचरा उचलण्याचे निर्देश दिले. विशेष म्हणजे, पिंपरी-चिंचवडमधील सोसायटी फेडरेशनने घेतलेल्या आक्रमक भूमिकेचा फायदा संपूर्ण राज्यातील महापालिका क्षेत्रातील सोसायटीधारकांना होणार आहे.

### पटसंख्या वाढवण्यासाठी उपाययोजना ...

महापालिका शाळांचा दर्जा वाढवण्यासाठी १० शाळांची निवड करण्यात येईल. त्याठिकाणी पायाभूत सुविधा सक्षम करण्यासाठी ‘सीएसआर’, महापालिका आणि राज्य सरकारच्या माध्यमातून दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. त्याद्वारे पटसंख्या वाढवण्यावर भर देण्यात येणार आहे. रस्त्यांच्या खड्डयांचा प्रश्न सोडवण्यासाठी दि. १ जानेवारीपासून मोहीम सुरू करण्याची भूमिका प्रशासनाची आहे. कारण, पाउस अद्याप थांबलेला नाही. मात्र, आम्ही दि.१ डिसेंबरपासून खड्डे बुजवण्याची मोहीम सुरू करावी, असा आग्रह धरला आहे. मधल्या काळात शक्य त्या सर्व ठिकाणी प्रशासन रस्त्यांची दुरूस्ती करीत आहे.

# ‘वायसीएम’ रुग्णालयातील व्यवस्था बदला !

## आमदार अण्णा बनसोडे यांची मागणी : महापालिका प्रशासनाला निवेदन

**पिंपरी।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

मृतदेह बदली झाल्यानंतर झालेल्या नातेवाईकांच्या संतापाच्या पार्श्वभूमीवर वायसीएम रुग्णालयातील व्यवस्थेत बदल करावा. त्यामध्ये रुग्णालय सेवा पदव्युत्यर शिक्षण संस्था, प्रशासन व निविदा विषयक कामकाज असे विभाग करण्यात यावेत व रुग्णालय सेवा हा विभाग वैद्यकीय अधिक्षकांकडे देण्यात यावा. तसेच, पदव्यूत्यर शिक्षण संस्थेचा कारभार अधिष्ठता यांच्याकडे, तसेच प्रशासन व निविदा विषयक कामकाज उपआयुक्त दर्जाचा अधिकारी



नेमून यांच्याकडे देण्यात यावी, अशी मागणी पिंपरी विधानसभा मतदार संघाचे आमदार अण्णा बनसोडे यांनी केली आहे.

याबाबत महापालिका आयुक्त व प्रशासक शेखर सिंह यांना निवेदन देण्यात आले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील मृतदेह अदलाबदलाच्या प्रकारामुळे रुग्णालयातील भोंगळ कारभार नुकताच चव्हाट्यावर आला आहे. कै.स्नेहलता गायकवाड या महिलेचा मृत्यू भिंत अंगावर कोसळ्याने झाला व शवविच्छेदनासाठी वायसीएममध्ये दाखल करण्यात आला होता. शवागृहातून या महिलेचा मृतदेह दुसऱ्याच मृत व्यक्तीच्या नातेवाईकांना दिला व त्या नातेवाईकांनी अदलाबदल झालेल्या मृत व्यक्तीचा अंत्य विधी उरकून टाकला.

### शहरात साथीच्या आजाराचे प्रमाण वाढले...

**दिवाळीचा काळ असल्याने व शहरातील नागरिक घराबाहेर पडत असुन सर्दी, खोकला, ताप, चिकनगुण्या, डेंगू यांसारख्या साथीच्या आजारांचे प्रमाण वाढलेले आहे. या बाबत मात्र पालिका प्रशासानाचा नियोजन शून्य कारभार असल्याची खंत बनसोडे यांनी व्यक्त केली आहे. याच बरोबर केसपेपरसाठी मोठी रंग रुग्णालय परिसरामध्ये दिसुन येते यासाठी केसपेपर सुविधा ऑनलाईन करण्यात यावी. विकसित करून अथवा सारथी मध्येच केसपेपर सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी, अशीही मागणी आमदार बनसोडे यांनी केली आहे.**

> “ उपआयुक्त दर्जाचा अधिकारी नेमल्याने YCM रुग्णालयातील रुग्णसेवा शिक्षण व प्रशासन कारभार गतिमान होऊन नागरिकांना चांगली सेवा मिळू शकेल अशी अपेक्षा बनसोडे यांनी व्यक्त केली आहे. तसेच शहरातील किरकोळ आजाराचे रुग्ण YCM येथे OPD साठी येत असुन गर्दी होत आहे व परिणामी स्पेशालिटी व सुपर स्पेशालिटी OPD साठी आलेल्या नागरिकांना गैरसोयीस सामोरे जावे लागत आहे. सध्या शहरात २९ दवाखाने व ८ मोठी रुग्णालये आहेत. मनपा दवाखाण्यातील कारभार योग्य नसल्याने अथवा प्रशिक्षित कर्मचारी वर्ग नसल्याने रुग्ण थेट YCM रुग्णालय गाठतात व या ठिकाणी उपचारासाठी धावपळ करतात. मनपा प्रशासनाने २९ दवाखाण्यातील सेवा तपासणी करावी व जनजागृती करून मनपा दवाखाण्यातील सेवांबाबत नागरिकांना माहिती देण्यात यावी, अशीही मागणी केली आहे.कोसध्या YCM रूग्णालयासह सर्व दवाखाने तसेच रुग्णालये या ठिकाणी रुग्णास केस-पेपरसाठी किंवा आंतररुग्ण सेवेसाठी आकारलेले बिल हे रोख स्वरुपात भरावे लागत असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. म्हणून करसंकलन विभागा प्रमाणे (ऑनलाईन भरणा करण्यासाठी) केसपेपर व इतर रुग्णालयीन सेवा ऑनलाईन करण्यात यावी.
>
> **-अण्णा बनसोडे, आमदार , पिंपरी.**

## संपादकीय

# दिवाळीत सुवर्ण झुंबड!

***दिवाळी आली की सोने खरेदीला झुंबड उडते. विशेषत: गुरुपुष्यामृताच्या मुहूर्तावर सोने खरेदीला प्राधान्य दिले जाते. मागील आठवड्यात आंतरराष्ट्रीय मौल्यवान धातूच्या किमती आणि रुपयाच्या घसरणीमध्ये सुधारणा होतानाच गेल्या काही दिवसात सोन्या-चांदीच्या भावातही घसरण होताना दिसली; मात्र आता ऐन दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर सोन्या-चांदीच्या भावात या आठवड्याच्या सुरवातीपासूनच तेजी दिसून आली.***

आंतरराष्ट्रीय बाजार आणि भारतीय वायदे बाजारात सोन्या-चांदीच्या दरात बदल झाला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्यात घसरण झाली तर चांदीमध्ये किंचित वाढ झाली आहे. हाच ट्रेण्ड भारतीय बाजारपेठेत गेल्या आठवड्यापासून दिसून आला. आंतरराष्ट्रीय मौल्यवान धातूच्या किमती आणि रुपयाच्या घसरणीमध्ये सुधारणा होत असताना १० ग्रॅम २२ कॅरेट सोन्याची किंमत गुरुवारी ४६ हजार ४२० रुपये असून मागील ट्रेडमध्ये ह्या मौल्यवान धातूची किंमत ४६ हजार ४६० रुपये प्रति १० ग्रॅमवरवर बंद झाली होती.गुड रिटर्न्स वेबसाईटनुसार मुंबईमध्ये २२ कॅरेट सोन्याची किंमत प्रति १० ग्रॅम ४६ हजार ४२० रुपये आहे. मुंबईत २४ कॅरेट सोन्याची किंमत ५० हजार ६४० प्रति १० ग्रॅम आहे. तर, नाशिकमध्ये २४ कॅरेट सोन्याचा दर ४६ हजार ४५० आहे तर प्रति १० ग्रॅम २२ कॅरेट सोन्याचा दर ५० हजार ६७० रुपये आहे. खरे तर, यंदाची दिवाळी कोरोना काळानंतर येत असल्यामुळे धनत्रयोदशीला सोन्याची अधिक खरेदी होईल असा अंदाज वर्तवण्यात येत आहे. कोरोनाच्या पहिल्या व दुसऱ्या लाटेमुळे अनेकांनी आपले विवाह पुढे ढकलले आहेत. लांबणीवर टाकलेले विवाह यावर्षी होणार असून त्याचा मोठा फायदा दागिने उद्योगाला होणार आहे. त्याचप्रमाणे गेल्या दोन वर्षांत सराफांच्या दालनात जाऊन प्रत्यक्ष सोनेखरेदी करता न आल्यामुळे यावर्षी ग्राहक मोठ्या प्रमाणावर सोने खरेदी करतील, अशी अपेक्षा आहे. यंदा दिवाळीपर्यंत सोन्याच्या भावात मोठी वाढ होईल, असा अंदाज होता. जगभरातील मध्यवर्ती बँकांच्या रिलीफ पॅकेज आणि कमी व्याज धोरणामुळे बाजारात पैसा वाढला आहे, त्यामुळे महागाईचा दर वाढत आहे. हे दीर्घकालीन सोन्याच्या किमतीला गती देण्यासाठी कार्य करू शकते. गुंतवणूकदार किमतींच्या घसरणीचा फायदा घेतील आणि त्यांच्या पोर्टफोलिओमध्ये सोन्यातील गुंतवणूक वाढवतील.



## आनंदी सकाळ

### अंतःकरण दुर्गुणांपासून स्वच्छ करावे

आपले ध्येय काय असावे हे ठरविण्याची बुद्धी माणसाला आहे, ती खालच्या प्राण्यांना नाही. हाच माणसात आणि त्या प्राण्यांत फरक आहे. प्राण्यांना प्रारब्धाने आलेले भोग भोगावे लागतात, त्याचप्रमाणे माणसालादेखील आलेले भोग भोगावे लागतात, पण भगवंताचा पाठिंबा ज्याला आहे तो मागेपुढे सोयीने भोग भोगू शकतो. जगातल्या घडामोडी जशा चालतात, तशाच आपल्याही सर्व गोष्टी प्रारब्धाने चालतात. आपण जे मिळविले आहे ते स्वतःच्या प्रयत्नाने मिळाले, ही कल्पना गेल्याशिवाय देह प्रारब्धावर टाकता येणार नाही. 'माझे सर्व हे त्याच्या कृतीचे फळ आहे,' असे म्हटले तर क्रिया तर चालते, पण कर्तेपण राहात नाही. पुष्कळ गोष्टी अशा आहेत की, त्यांच्याकडे बोट दाखवून त्यांचे कारण अमुक असे आपण सांगू शकतो, पण काही गोष्टी अशा आहेत की, त्यांचे कारण आपल्याला दाखविता येत नाही.

# खरगे यांच्या पुढील आव्हान...







अखिल भारतीय काँग्रेस अध्यक्षपदाच्या झालेल्या निवडणुकीत अखेरीस अपेक्षेप्रमाणेच जेष्ठ काँग्रेस नेते मल्लिकार्जुन खरगे यांचा दणदणीत विजय झाला आहे. या विजयाबद्दल तसेच त्यांना मिळालेल्या संधीबद्दल खरे तर त्यांनी व गांधी घराण्याव्यतिरिक्त असलेल्या काँग्रेस नेत्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सर्वप्रथम आभार मानायला हवेत. कारण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गांधी घराण्याबाबत जेवढी भाजपमध्ये जागरूकता केली त्याहीपेक्षा अधिक जागरूकता त्यांच्या भाषणांनी काँग्रेस पक्षात केली. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराचे पडघम वाजायला सुरुवात झाल्यापासून नरेंद्र मोदी या पंचाक्षरी भाजपा नेत्याचा करिष्मा हा संपूर्ण देशभर अफाट भाषणांनी अक्षरश: करिष्मा घडवत होता.

भारतीय जनतेने नरेंद्र मोदी यांना लोकप्रियतेच्या उत्तुंग शिखरावर नेऊन बसवण्यामागे जसे भाजप संघ परिवार आणि हिंदुत्ववाद हा जसा प्रमुख कारणीभूत असल्याचे समजले जाते, त्याचबरोबर नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यानंतरचा विशेषत: गेल्या अडीच दशकांमधील नवा गांधीवाद भारतीय जनतेसमोर अत्यंत प्रभावीपणे मांडला आणि मुळातच नरेंद्र मोदी यांचे जे नेतृत्व संपूर्ण देशभरात गेल्या आठ वर्षांच्या काळात उभे राहिले त्याच्यामुळे हा नवा गांधीवाद प्रामुख्याने आहे असे म्हटले तर त्याचे आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

या काळातील काँग्रेसमधील पक्षांतर्गत राजकारण लक्षात घेतले तर सीताराम केसरी हे गांधी घराण्याव्यतिरिक्त झालेले शेवटचे अखिल भारतीय काँग्रेसचे अध्यक्ष म्हणावे लागतील. केसरी अध्यक्ष होऊन आता चोवीस वर्षे उलटून गेली आहेत, म्हणजे जवळपास अडीच दशकांचा हा कार्यकाळ म्हटलं तरी काही हरकत नाही. या काळापैकी २००४ ते २०१४ असे १० वर्षे काँग्रेस प्रणित यूपीए सरकार दोन टर्म देशात सत्तेवर होते. मनमोहन सिंग यांच्यासारखे नावाजलेले आणि अभ्यासू अर्थतज्ज्ञ हे या देशाच्या पंतप्रधानपदी होते आणि यूपीएच्या तसेच काँग्रेसचे अध्यक्ष म्हणूनही दहा वर्ष देशाची संपूर्ण सूत्रे काँग्रेस हाय कमांड म्हणून सोनिया गांधी यांच्याकडे होती. या काळात केंद्र सरकारवर पूर्णपणे सोनिया गांधी यांचा रिमोट कंट्रोल चालत होता. राहुल गांधी यांनी पक्षाचा पुढील अध्यक्ष हा गांधी कुटूंबाबाहेरील असावा, असे जाहीर करून काँग्रेस ही काही आमच्या घराण्याची मोनोपॉली नाही, हे दाखवून देण्याचा प्रयत्न केला. पण भारतातील लोकांच्या मनावर अजूनही आडनावाचा पगडा आहे. त्यामुळे गांधी आणि काँग्रेस हे एका चक्रात अडकून पडले आहेत, त्या चक्रातून त्यांची सुटका होणे अवघड आहे. गांधी घराण्यात राष्ट्रीय पातळीवर आपला करिश्मा दाखवणारा नेता निर्माण झाला, तर त्याला काँग्रेसला एकहाती सत्ता मिळवता येईल, जशी इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांनी मिळवली होती, पण सध्या काँग्रेससाठी तशी अनुकूल स्थिती नाही.

# साक्षर केरळमध्ये काळ्या जादूचा पगडा

**नरबळीनंतरही काहीच फायदा होत नसल्याने सिंग दाम्पत्य पुन्हा रशिदच्या चरणी गेलं. रशिदवर त्यांची प्रचंड श्रध्दा होती. ग्रहांचा प्रकोप आणि इतर फालतू कारणं देत रशिदने अंधश्रध्देत अखंड बुडालेल्या सिंग दाम्पत्याला आणखी एका महिलेचा बळी दिला पाहिजे, हे पटवून दिलं.**

देशात सर्वाधिक साक्षरता असलेलं राज्य म्हणून केरळ राज्याचा अभिमानानं उल्लेख केला जातो. त्याच केरळमध्ये दोन महिलांचा नरबळी घेतल्याचं, इतकंच नाही तर एका महिलेचं मांस विधीपूर्वक खाल्याचं धक्कादायक प्रकरण समोर आलं आहे. याघटनेतील मूख्य सूत्रधार तथाकथित भोंदूबाबा विकृत मनोवृत्तीचा आहे. तर पैशांच्या मोहापायी भोंदूबाबाच्या जाळ्यात पती-पत्नी आणि दोन्ही मृत महिला अडकल्याचे स्पष्ट होताना दिसतंय. त्यातूनच केरळमधील आर्थिक विषमताही समोर आली आहे. मुंबईतही तीन वर्षांच्या चिमुरडीचा नरबळी दिल्याच्या संशयावरून एका परदेशी नागरिकाला अटक करण्यात आली आहे. साऱ्या देशाला हादरवून टाकणाऱ्या आणि काळिमा फासणाऱ्या या घटना आहेत. केरळमधील थिरुवल्लाजवळील कोझेंचेरी तालुक्यातील एलंथूर या खेड्यात नरबळीचा प्रकार घडला आहे. गावातील मोहम्मद शफी ऊर्फ रशीदने स्थानिक वर्तमानपत्रात दिलेल्या जाहिरातीत सर्व




दुःखे घालवून श्रीमंत करू असा दावा केला होता.

ही जाहिरात वाचून भागवल सिंग आणि त्याची पत्नी लैला यांनी रशिदची भेट घेतली. त्यावेळी रशिदने दोघांना श्रीमंत व्हायचं असेल तर एका महिलेचा बळी देऊन त्याचं रक्त शिंपलं पाहिजे, असं सांगत बळीसाठी महिला शोधून आणण्याच्या कामाला जुंपलं. रशिदवर असलेला विश्वास आणि झटपट श्रीमंत होण्याच्या मोहाने पछाडलेल्या भागवल आणि शैलाने नरबळीसाठी सावज शोधायला सुरूवात केली. सिंग दाम्पत्याच्या नजरेत एक महिला आली. त्यांनी तिला आपल्या घरी बोलावलं. त्यानंतर रशिदने तिला पैशांचं आमिष दाखवून सिंग दाम्पत्याच्या मदतीनं त्या निष्पाप महिलेची निर्घृण हत्या केली. तिच्यावर अत्याचारही केले. त्यानंतर विधीच्या नावाखाली अघोरी कृत्य केलं.

नरबळीनंतरही काहीच फायदा होत नसल्याने सिंग दाम्पत्य पुन्हा रशिदच्या चरणी गेलं. रशिदवर त्यांची प्रचंड श्रध्दा होती. ग्रहांचा प्रकोप आणि इतर फालतू कारणं देत रशिदने अंधश्रध्देत अखंड बुडालेल्या सिंग दाम्पत्याला आणखी एका महिलेचा बळी दिला पाहिजे, हे पटवून दिलं. त्यानंतर आणखी एका महिलेला फसवून घरी आणलं गेलं. यावेळी तिची अत्यंत निर्घृणपणे, थंड डोक्यानं हत्या करण्यात आली. तिच्यावरही अत्याचार करण्यात आले. तिच्या शरीराचे एक दोन नव्हे तर तब्बल 56 तुकडे करून घरच्या अंगणात पुरण्यात आले. धक्कादायक बाब म्हणजे दुसऱ्या महिलेची हत्या केल्यानंतर तिचे मांस खाल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झालं आहे. पहिल्या महिलेचा कुणी शोध न घेतल्याने ही हत्या खपून गेली होती. त्यामुळेच मारेकऱ्यांनी दुसरी हत्या करून नरबळी देण्याचा बेत आखला होता.

## ।। अभंगवाणी ।।



मैत्र केले महा बळी ।
कामा न येती अंतकाळीं ।।१।।
आधीं घे रे रामनाम ।
सामा भरीं हा उत्तम ।।ध्रु.।।

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)


# ‘एक बार मैं ने कमिटमेंट कर दी तो...’

## भास्कर जाधवांचा विरोधकांना इशारा

**।अलिबाग। महाईन्यूज।**

**शिवसेनेते उभी फुट पडल्यापासून ठाकरे गटातील आमदार भास्कर जाधव शिंदे गटातील आमदार आणि भाजपावर जोरदार टीका करत आहे. नुकताच भास्कर जाधव चिपळूनमध्ये पोहोचले असता त्यांनी विरोधकांवर निशाणा साधला.**

शुक्रवारी संध्याकाळच्या सुमारास भास्कर जाधव चिपळून स्थानकात पोहोचले असता, त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. त्यावेळी भास्कर जाधव यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना, अभिनेता सलमान खानप्रमाणे त्यांनी विरोधकांना प्रत्युत्तर दिले. यावेळी “एकदा भूमिका घेतल्यानंतर मी कधीही दुष्परिणामांची चिंता करीत नाही”, अशा शब्दांत विरोधकांना प्रत्युत्तर दिले. ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव यांच्या घरावर



2 दिवसांपूर्वी रात्रीच्या वेळी हल्ल्याचा प्रयत्न झाला. त्यांच्या घराबाहेर काही संशयास्पद वस्तूदेखील आढळल्या आहेत. याशिवाय भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी विखारी शब्दांमध्ये जाधवांवर टीकास्त्र सोडले. त्यानंतर भाजपा नेते निलेश राणे यांनीही भास्कर जाधव यांच्यावर टीका केली.

“मागील काही दिवसांपासून आमच्या पक्षप्रमुखांवर खालच्या स्तरावर टीका केली जात आहे. आमचे ४० सहकारी सोडून गेले. भाजपने शिवसेना पक्ष संपवण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. त्यामुळे शिवसैनिक आतल्या आत तळपत आहे. उद्धव ठाकरे हे शिवसैनिकांना शांत राहण्याचं आवाहन करीत आहेत. परंतु आता शिवसैनिक डरकाळी फोडण्याच्या तयारीत आहे”, असे भास्कर जाधव यांनी म्हटले.

# ठाण्यात गोळीबार : दोघे गजाआड

**।ठाणे।महाईन्यूज।**

मुख्यमंत्र्यांच्या ठाण्यात काही तासांच्या अंतरावर झालेल्या दुहेरी गोळीबार प्रकरणात,बदलापूर येथील बिपीन राजेंद्र मिश्रा आणि सौरव शिंदे या दुकलीला ठाणे शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अवघ्या काही तासातच जेरबंद केले. त्या दोघांनी गुन्ह्याची कबुली दिली असून त्यांनी गंभीररीत्या जखमी झालेल्या कुख्यात गुंड गणेश जाधव उर्फ काळ्या गण्या याने खंडणीची मागणी केली. ती मागणी पूर्ण न झाल्याने डोक्यात गोळी झाडून पळ काढल्याची माहिती पोलीसांनी दिली. तसेच गणेश जाधववर रुग्णालयात उपचार सुरू होते. परंतु त्याचा मृत्यू झाल्याची चर्चा आहे. मात्र, अधिकृत दुजोरा रात्री उशीरा रात्रीपर्यंत मिळाला नाही.



शुक्रवारी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास घंटाळी नौपाडा येथे अश्विन गंगाराम गमरे, यास ठार मारण्याच्या उद्देशाने अग्निशस्त्रातुन गोळीबार करून गंभीर जखमी केले होते. या प्रकरणी नौपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. त्यानंतर, वर्तकनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत लोकमान्यनगर पाडा नं. ४ येथील जंगलातील नाल्याजवळ नामचीन गुंड गणेश सुधाकर जाधव उर्फ काळा गण्या यास खंडणीच्या रकमेची मागणी केली. ती मागणी पूर्ण केली नाही. म्हणून जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने बिपीन आणि सौरव यांनी अग्निशस्त्रातुन डोक्यात गोळी मारून गंभीर जखमी केले. एकाच दिवशी दोन्ही गोळीबाराच्या घटना घडल्याने पोलीस आयुक्त जयजीत सिंह यांनी ठाणे शहर पोलीसांना त्वरीत गुन्हयातील मारेकऱ्यांना अटक करण्याच्या सक्त सुचना दिल्या होत्या. याचदरम्यान ते दोघे मुंबई मुलुंड नवघर येथे असल्याची माहिती ठाणे शहर गुन्हे शाखा, घटक ५, वागळे मधील पोलीस हवालदार सुनिल निकम यांना मिळाली होती. तेथे सापळा रचुन त्यांना शिताफीने अटक केली. त्यांनी दोन्ही गुन्हे कबुली दिली असून त्यांच्याकडे गुन्हयात वापरलेले अग्निशस्त्र जप्त करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# नेरळ-माथेरान नॅरो गेज नवीन रूपात

## शनिवारपासून पून्हा येणार सेवेत

**। नेरळ। महाईन्यूज ।**

2019 मध्ये नेरळ-माथेरान सेक्शनवर 20 हून अधिक ठिकाणी झालेल्या अभूतपूर्व पाऊस आणि नुकसानीनंतर, मध्य रेल्वेने सेक्शनमधील ट्रॅक आणि राइड सुधारण्यासाठी अनेक पायाभूत सुविधांची कामे हाती घेतली आहेत. रुळाच्या एका बाजूला डोंगर आणि दुसऱ्या बाजूला खोल दरी यामुळे खडतर प्रदेश असूनही ट्रॅक मजबूत करण्यासाठी आवश्यक स्लीपर आणि इतर साहित्य हलवण्याचे अवघड काम मध्य रेल्वेने पार पाडले.

मध्य रेल्वेच्या कर्मचाऱ्यांनी पाळ्यांमध्ये रात्रभर काम केले आणि तटबंदी मजबूत केली आणि ट्रॅकच्या खाली रिटेनिंग वॉल, गॅबियन प्रोटेक्शन



आणि स्टोन पिचिंगचे ग्राउटिंग, ट्रॅकच्या बाजूला क्रॅश प्रतिबंधक बॅरियरची तरतूद, पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी बाजूच्या नाल्यांची तरतूद केली,. अतिरिक्त बॉक्स ब्रिज आणि पाईप ब्रिज तरतूद केली. सध्याचे स्लीपर जे स्टीलचे होते ते कॉंक्रीट स्लीपरने बदलले. आतापर्यंत 20 किमीच्या 14 किमीचे जुने स्टील स्लीपर कॉंक्रिट स्लीपरने बदलले आहेत. सध्याच्या पुलांच्या मजबुतीकरणासोबतच 30 नवीन पूल बांधण्यात आले आहेत आणि 2 किमी बाजूचा नाला बांधण्यात आला आहे ज्यामुळे आता पावसाचे पाणी रुळावरून वाहून जाण्याऐवजी प्रवाहित होण्यास मदत होईल. पुढे, खोल खोऱ्यांच्या संवेदनशील ठिकाणी 3000 घनमीटर गॅबियन भिंत आणि 90 मीटर राखीव भिंत बांधण्यात आली. असुरक्षित ठिकाणी 2.2 किमी अँटी क्रॅश बॅरियर बांधण्यात आले आहेत. खोल खोऱ्याच्या ठिकाणी 1 किमी लांबीच्या गार्ड रेलची तरतूद पूर्ण झाली आहे आणि उर्वरित 690 मीटर लांबीचे काम प्रगतीपथावर आहे.

मध्य रेल्वे एनजी विभागासाठी नवीन डिझाईन DEMU प्रकारच्या सेल्फ-प्रोपेल्ड ट्रेनसाठी ICF शी चर्चा करत आहे. या विभागावर सलून बुक करण्याबाबतही विचार केला जात आहे.

# कवठेमहांकाळ नगरपंचायतमध्ये रोहित पाटलांची सत्ता संपुष्टात

## राष्ट्रवादीची चार मतं फुटल्याने पराभव

**। सांगली ।महाईन्यूज ।**

सांगली लोकसभा मतदारसंघाचे भाजपा खासदार संजय काका पाटील यांच्या गटाकडून राष्ट्रवादीचे दिवंगत नेते आर आर पाटील यांचे सुपुत्र रोहित आर. आर. पाटील यांच्या गटाचा पराभव झाला राष्ट्रवादीचे चार नगरसेवक फुटल्यामुळे कवठेमहांकाळ नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत भाजपा खासदार समर्थक उमेदवाराचा विजय झाला. सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ नगरपंचायतीमध्ये राष्ट्रवादीचे बहुमत असूनही खासदार संजय काका पाटील गटाच्या सिंधुताई गावडे निवडणुकीत विजयी झाल्या. यामुळे राष्ट्रवादीचे युवा नेते रोहित पाटील यांना मोठा धक्का बसला आहे.

नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादीकडून राहुल जगताप यांना उमेदवारी देण्यात आली होती. तर भाजपा खासदार व विरोधी गटाकडून सिंधुताई गावडे यांना उमेदवारी देण्यात आली होती. मात्र, निवडणुकीच्या वेळी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे १० पैकी चार सदस्य फुटले.

राहुल जगताप आणि सिंधुताई गावडे यांना प्रत्येकी आठ मते मिळाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी चिठ्ठीवर सोडत घेतली. ज्यामध्ये सिंधुताई गावडे निवडून आल्या. त्यामुळे नगराध्यक्ष निवडणुकीत सिंधुताई गावडे यांचा विजय झाला असून राष्ट्रवादीचे युवा नेते रोहित आर आर पाटील यांची सत्ता अखेर संपुष्टात आली.



# मॅक्सिकोमध्ये ऑईल टँकरची धडक!

## ट्रेन पूर्णपणे जळून खाक



। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

उत्तर अमेरिकेतील मेक्सिकोमध्ये भीषण अपघाताची घटना घडली आहे. एका भरधाव वेगाने जाणाऱ्या ट्रेन आणि ऑईल ट्रकची आपापसात धडक झाली, यावेळी ऑईल ट्रक पलटी होऊन भीषण आग लागली. या घटनेचे काही फोटो आणि व्हिडीओ समोर आले आहेत. यात आगीच्या भक्षस्थानी असलेली ट्रेन न थांबता रुळावरून धावत राहिली, यातील ट्रेन पूर्णपणे जळून खाक झाली आहे. पोलिसांनी संबंधित ट्रक चालकाला अटक केली आहे.

मेक्सिकोच्या अगुआस्कॅलिएंट्स शहरात ही घटना घडली आहे. रेल्वे क्रॉसिंगजवळ मालवाहू ट्रेनची ट्रकला जोरदार धडक बसली, यावेळी ट्रकमध्ये ऑईल होते. यावेळी रेल्वेच्या धडकेत ट्रक पलटी होऊन दोन्ही वाहनांनी पेट घेतला. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी पोहोचले असून आग विझवण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत, समोर आलेल्या व्हिडीओ आणि फोटोतून आगीतून धुराचे लोट उठताना दिसत आहेत. या घटनेत जीवितहानी झाल्याची कोणतीही माहिती अद्याप समोर आलेली नाही.

आगीचे स्वरुप भीषण असल्याने आग विझवण्यासाठी सुमारे 200 अग्निशमन दल पाठवण्यात आले होते, असे एल युनिव्हर्सल वृत्तपत्राने म्हटले आहे. आग खूप वेगाने पसरत होती. यामुळे जवळपासच्या काही घरांचेही मोठे नुकसान झाले आहे. याठिकाणी राहणाऱ्या 12 जणांची सुटका करण्यात आली आहे. यातील अनेक जण जखमी झाल्याचे सांगण्यात येत आहे. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनास्थळाजवळ राहणाऱ्या सुमारे 1500 लोकांनाही सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे.

# गुगलला 1,337 कोटींचा दंड

## कॉम्पिटिशन कमीशन ऑफ इंडियाची कारवाई

।नवी दिल्ली। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



गुगलला भारतातील स्पर्धाविरोधी पद्धतींसाठी मोठा दंड ठोठावण्यात आला आहे. गुगलला 1,337 कोटी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. कॉम्पिटिशन कमिशन ऑफ इंडिया (CCI) ने हा दंड अँड्रॉइड मोबाईल डिव्हाइसेसच्या संदर्भात स्पर्धाविरोधी प्रथांसाठी लावला आहे. गुगलने अँड्रॉइड मोबाईल डिव्हाईस इकोसिस्टमचा गैरवापर केल्याचे भारतीय स्पर्धा आयोगाचे म्हणणे आहे. अलीकडेच एका संसदीय समितीने डिजिटल क्षेत्रातील स्पर्धाविरोधी क्रियाकलापांची चौकशी करण्यासाठी भारतातील Apple, Google, Amazon, Netflix आणि Microsoft या प्रमुख भारतीय अधिकाऱ्यांना नोटीस बजावली होती.

अलीकडेच विविध तंत्रज्ञान प्लॅटफॉर्म आणि कंपन्यांमध्ये समन्वय नसल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. तेव्हापासून या प्रकरणात स्पर्धेतील विविध पैलू तपासले जात होते. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी जयंत सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली अर्थविषयक संसदीय स्थायी समिती स्थापन करण्यात आली होती. ही समिती टेक मार्केटमधील स्पर्धा आणि डिजिटल क्षेत्रातील स्पर्धाविरोधी क्रियाकलापांच्या विविध पैलूंची तपासणी करत आहे.

# पाचवीच्या विद्यार्थ्याला कचरा कुंडीत बसण्यास भाग

## आंध्र प्रदेशातील शिक्षकावर गुन्हा दाखल

। अमरावती । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्याला शिक्षा म्हणून शाळेत कचऱ्याच्या डब्यात बसण्यास भाग पाडल्याचे गंभीर प्रकरण समोर आले आहे. आंध्र प्रदेशातील आंबेडकर कोनासीमा जिल्ह्यातील अंतरवेदिपालेम जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये ही घटना घडली.

गुरुवारी, इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्याला शाळेत कचरा कुंडीत बसण्यास भाग पाडले गेले. कचरा कुंडीत बसवल्यानंतर सुमारे 45 मिनिटे कचरा कुंडीचे झाकन बंद ठेवले गेले होते. अखेर विद्यार्थ्याच्या बहिणीने येऊन झाकण उघडल्याने विद्यार्थ्याची सुटका झाली. त्यांनतर विद्यार्थ्याला रडू कोसळले होते.

वर्गात दुसऱ्याच्या चुकीसाठी आपल्याला दोषी ठरवलं गेलं. तसेच कचरापेटीत बसवले गेले, असा दावा या विद्यार्थ्याने केला आहे.या घटनेनंतर, वायसीपी नेते सहदेव यांच्यासह विद्यार्थी संघटनेच्या नेत्यांनी निदर्शने केली. तसेच अल्विन बाबा या शिक्षकावर एससी/एसटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करण्याची मागणी केली.दरम्यान विद्यार्थ्याच्या आईने तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.



# ...तरीही ईडीकडून झालेल्या अटकेला रोखता येणार नाही : सर्वोच्च न्यायालय

। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



तृणमूलचे आमदार आणि पश्चिम बंगाल प्राथमिक शिक्षण मंडळाचे माजी अध्यक्ष माणिक भट्टाचार्य यांना पश्चिम बंगाल शिक्षक भरती घोटाळ्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा झटका बसला आहे. प्राथमिक शिक्षकांच्या नियुक्तींमधील कथित अनियमिततेशी संबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरणात ईडीच्या अटकेला आव्हान देणारी भट्टाचार्य यांची याचिका सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी फेटाळून लावली.

प्राथमिक शिक्षक भरती घोटाळ्यात माणिक यांना सीबीआयने समन्स बजावले होते, त्यांनतर त्यांनी प्रथम कोलकाता उच्च न्यायालयात अपील केले होते आणि तेथून दिलासा न मिळाल्याने त्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. सुप्रीम कोर्टाने भट्टाचार्य यांच्या याचिकेवर सुनावणी घेतल्यानंतर 30 सप्टेंबरला आपला निर्णय राखून ठेवताना अटकेपासून वाढीव संरक्षणाची सीबीआयची मागणी देखील मान्य केली आणि पुढील आदेशापर्यंत अंतरिम संरक्षण देऊन तपासात सहकार्य करण्यास सांगितले. मात्र या प्रकरणातील सीबीआय तपासाला स्थगिती नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले होते. 10 ऑक्टोबरला माणिक भट्टाचार्य यांची रात्रभर चौकशी केल्यानंतर भरती घोटाळ्याच्या तपासात असहकार्य केल्याच्या आरोपाखाली त्यांना अटक केली होती. दुसरीकडे ईडीच्या आजारपणामुळे आमदारांना ESI हॉस्पिटल येथे नेण्यात आले. रविवारी त्यांना वैद्यकीय तपासणीसाठी नेण्यात आले. यानंतर सोमवारी भट्टाचार्य यांची आरोग्य तपासणीही करण्यात आली. मात्र, ईडीच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, माणिक

### माणिक यांचे तपस मंडळ चार स्वयंसेवी संस्था चालवायचे

**याशिवाय माणिक भट्टाचार्य यांचे निकटवर्तीय तपस मंडल यांना 20 ऑक्टोबर रोजी चौकशीसाठी बोलावण्यात आले. ते चार स्वयंसेवी संस्था चालवायचे, ज्यांच्या बॅनरखाली सहा खासगी शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयेही चालत होती. या सर्व संस्थांच्या कारवाया काय होत्या, याचाही तपास ईडीच्या पथकाने केला आहे.**

# 'माझी तुझी रेशीमगाठ' मालिकेत 'नेहा' लवकरच परतणार? नवा लूक चर्चेत

मालिका विश्वात दररोज नवीन घडामोडी घडत असतात. माझी तुझी रेशीमगाठ' या झी वाहिनीवरील मालिकेने अल्पावधीतच प्रेक्षकांची मनं जिंकली. मालिकेतील यश-नेहाची जोडी आणि परीवर प्रेक्षक भरभरुन प्रेम करतात. सध्या मालिकेत एक वेगळा ट्रॅक सुरु आहे. यश आणि नेहाच्या गाडीला अपघात झाल्याचं दाखवण्यात आलं आहे.या जीवघेण्या संकटातून यश तर बचावतो. मात्र नेहा अजूनही बेपत्ता असल्याचं दाखवण्यात आलं आहे. मालिकेत असं दाखवलं आहे की नेहाचा सगळे शोध घेत आहेत मात्र ती कुठेच सापडत नाही. अखेर नव्या भागात तिला मृत म्हणून घोषित करण्यात आले आहे. मालिकेतील या कथानकामुळे प्रेक्षक नाखुश असल्याचं पाहायला मिळत आहे. म्हणूनच कदाचित आता मालिकेत नेहाची एंट्री होणार आहे. एका नव्या रूपात ती आपल्याला दिसणार अशी शक्यता आहे. याबाबत झी वाहिनीने आपल्या इंस्टाग्राम अकाउंटवर नेहाचे म्हणजे अभिनेत्री प्रार्थना बेहरेचे नव्या रुपातले फोटो शेअर केले आहेत. त्यावर कॅप्शन दिला आहे ही 'नेहा की दुसरी कोण'? या पोस्टमुळे चाहत्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. प्रार्थना बेहरेने ही नुकतीच 'बस बाई बस' या कार्यक्रम सहभागी झाली होती. या कार्यक्रमात तिने अनेक गोष्टींबद्दल खुलासा केला. तिच्या हसण्यापासून ते वैभव तत्त्ववादी बरोबरच्या लग्नाच्या चर्चांवर तिने स्पष्टीकरण दिले आहे. प्रार्थनाने अभिषेक जावकरशी २०१७ साली लग्नगाठ बांधली. प्रार्थना मूळची बडोद्याची आहे, अभिनयात करियर करण्यासाठी तिने मुंबई गाठली.



# काजोलचा ग्लॅमरस लूक


सध्या सर्वसामान्य लोकांप्रमाणे बॉलिवूड कलाकारही सगळे सण अगदी थाटामाटात साजरे करत आहेत. गेली २ वर्षे कोणलाच काही सण साजरे करता न आल्याने आता यावर्षी सगळेच खूप आनंदात आहेत. बॉलिवूडमध्येही चांगलंच धमाल वातावरण पाहायला मिळतंय. बऱ्याच बॉलिवूड कलाकारांनी त्यांच्या घरी खासगी पार्ट्या आयोजित केल्या आहेत. अभिनेत्री क्रीती सनॉनने ही दिवाळीनिमित्त एक जंगी पार्टी दिली आहे. आता बॉलिवूडचा सर्वोत्तम फॅशन डिझायनर मनीष मल्होत्रा याच्या खासगी दिवाळी पार्टीतले फोटोज सध्या खूप व्हायरल होत आहे. तमाम बॉलिवूडकरांनी या पार्टीत हजेरी लावली. विकी-कतरिना, अभिषेक बच्चन, ऐश्वर्या राय, सारा अली खान, जान्हवी कपूर, कार्तिक आर्यन, माधुरी दीक्षित, सुहाना खान, अनन्या पांडे अशा कित्येकांनी या पार्टीत हजेरी लावली. अभिनेत्री 'काजोल'ही या पार्टीत दिसली आणि सोशल मीडियावर नेटकरी तिच्या लूकच्या प्रेमात पडले आहेत. ९० च्या दशकात कित्येकांच्या मनावर राज्य करणारी काजोल आजही तितकीच सुंदर दिसत आहे. या पार्टीत तिने चकचकीत पर्पल आणि काळ्या रंगाची एक डिझायनर साडी परिधान केली होती. ही साडी खुद्द मनीषने डिझाईन केली असून तिची किंमत तब्बल ३,२५,०००० इतकी आहे. मनीष मल्होत्राच्या ब्रँडची ती डिझायनर साडी, बॅकलेस ब्लाऊज, तसेच आकर्षक कानातले आणि ओठांवर असलेली हलकीशी न्यूड लिपस्टिक हा काजोलचा ग्लॅमरस लूक आणि त्यांची किंमत सध्या सोशल मीडियावर चांगलीच चर्चेत आहे.



# बॉक्स ऑफिसवरची कमाई ही...

## चित्रपटाच्या अपयशाबद्दल बोलताना परिणीती म्हणाली...

बॉलिवूडमधील अभिनेत्री आणि त्यांचे करियर कायमच चर्चेचा विषय बनतो. काही अभिनेत्रींचे करियर अवघ्या एक दोन चित्रपटांनंतर संपून जाते तर काही अभिनेत्री सातत्याने हिट चित्रपट देत असतात. अभिनेत्री परिणीती चोप्रा सध्या चर्चेत आहे. नुकताच तिचा कोड नेम हा चित्रपट प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाला फारसे यश मिळाले नाही. याआधी तिचे साईना, नमस्ते इंग्लंड, जबरिया जोडी या चित्रपटांना फारसे यश मिळाले नाही. नुकतीच तिने इंडिया टुडेला मुलाखत दिली आहे. या मुलाखतीत तिने आपल्या अपयशाबद्दल सांगितले आहे, ती असं म्हणाली की 'माझ्यासाठी माझ्या यशाचे मोजमाप म्हणजे बॉक्स ऑफिसवरची कमाई नव्हे तर प्रेक्षकांच्या येणाऱ्या प्रतिक्रिया माझ्यासाठी पुरेशा आहेत'. ती पुढे म्हणाली 'मला आयुष्यात पहिल्यांदाच अपयश पाहावं लागलं. जागतिक स्तरावर आपण अपयश पाहतो. अपयश तुमच्या आयुष्याला शिकवून जात. मी आज आनंदी आहे ते यामुळेच म्हणून मी कोड नेमसारखा चित्रपट निवडला'. परिणितीने आपल्या करियरची सुरवात यशराज फिल्म्समध्ये जनसंपर्क विभागातून केली आहे. 'लेडीज वर्सेस बेहल' या चित्रपटातून तिने पदार्पण



केले. त्यानंतर 'इशकजादे', 'हसी तो फसी', 'केसरी', 'शुध देशी रोमान्स' यांसारख्या वेगवेगळ्या धाटणीच्या चित्रपटांमधून तिने काम केले आहे. 'गोलमाल ४' चित्रपटातून ती एक वेगळ्या भूमिकेतून दिसली होती.

# "मला संपूर्ण घर पुन्हा डिझाइन करावे लागले होते" श्वेता तिवारीने सांगितला किस्सा

छोट्या पडद्यावरील अतिशय लोकप्रिय आणि सतत चर्चेत असणारी अभिनेत्री म्हणजे श्वेता तिवारी. ती नेहमीच काही ना काही कारणांमुळे चर्चेत असते. श्वेताला वाचनाची प्रचंड आवड आहे. ती अनेकदा तिच्या व्यग्र वेळापत्रकातून वेळ काढून वाचनाचा छंद जोपासताना दिसते. तिला काल्पनिक कथा असलेल्या पुस्तकांपेक्षा वास्तविक जीवनातील प्रेरणादायी कथा वाचायला आवडतात. नुकतंच तिने तिच्या पुस्तकांबद्दलच्या आवडी-निवडीबद्दल भाष्य केले आहे.


श्वेता तिवारीने नुकतंच 'दैनिक भास्कर' या वृत्तपत्राला मुलाखत दिली. या मुलाखतीत तिने तिच्या वाचनाच्या आवडीबद्दल सांगितले. यावेळी ती म्हणाली, "मला माझ्या फावल्या



वेळेत पुस्तकं वाचायला आवडतात. माझ्या शूटिंगचे वेळापत्रक कितीही व्यग्र असले तरीही मी एक तरी मनोरंजक कादंबरी वाचते. त्यातून मला फार आनंद आणि समाधान मिळते. लहानपणीपासून मला कादंबऱ्या वाचण्याची आवड होती. माझ्या आईकडून मला पुस्तकांवर प्रेम करण्याची शिकवण मिळाली आहे."

# माधुरी दीक्षितने केले ओटीटी माध्यमांचे कौतुक

'मजा मा' या चित्रपटाला मिळणाऱ्या प्रतिसादावर माधुरीने भाष्य केले आहे. धकधक गर्ल माधुरी दीक्षितने २०२० मध्ये ओटीटी विश्वात पदार्पण केले. तिने नेटफ्लिक्सच्या 'द फेअर गेम' या सीरिजमध्ये काम करत नव्या प्रवासाला सुरुवात केली. या सीरिजमध्ये तिच्यासह संजय कपूर, मानव कौल आणि सुहासिनी मुळे अशा कलाकारांनी काम केले आहे. तिच्या या सीरिजला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. काही आठवड्यांपूर्वी तिचा 'मजा मा' हा चित्रपट ॲमेझॉन



प्राईम व्हिडीओवर प्रदर्शित झाला. या चित्रपटातील तिच्या कामाचे सर्वत्र कौतुक होत आहे. नव्वदीचे दशक गाजवणाऱ्या माधुरी दीक्षितने अनेक दर्जेदार चित्रपटांमध्ये काम केले आहे. ओटीटीवर प्रदर्शित झालेला तिचा 'मजा मा' हा चित्रपट प्रेक्षकांच्या पसंतीस पडत आहे.

## शॉर्ट न्यूज »

### ऑस्ट्रेलियन विश्वचषक संघात कॅमेरॉन ग्रीनची एन्ट्री



। मुंबई । महाईन्यूज

ऑस्ट्रेलियाचा बॅकअप यष्टिरक्षक जोश इंग्लिसच्या हाताला दुखापत झाल्याने, तो टी२० विश्वचषकातून बाहेर पडला आहे. त्यामुळे जखमी जोश इंग्लिसच्या जागी ऑस्ट्रेलियन संघात कॅमेरॉन ग्रीनचा समावेश करण्यात आला आहे. ग्रीन हा उत्तम अष्टपैलू खेळाडू आहे. त्याला टी२० विश्वचषकासाठी ऑस्ट्रेलियन संघात का स्थान देण्यात आले नाही, यावर सतत चर्चा होत होती. बुधवारी सिडनीमध्ये गोल्फ खेळताना यजमान ऑस्ट्रेलियाचा बॅकअप यष्टिरक्षक इंग्लिसच्या हाताला दुखापत झाली आहे. ज्यामुळे अष्टपैलू कॅमेरॉन ग्रीनला त्याच्या जागी संधी मिळाली आहे. अष्टपैलू कॅमेरॉन ग्रीनने नुकत्याच झालेल्या भारत दौऱ्यात आपल्या खेळाने सर्वांना प्रभावित केले होते. कॅमेरॉन ग्रीनने आतापर्यंत ऑस्ट्रेलियासाठी १४ कसोटी, १२ एकदिवसीय आणि सात टी२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत.

# जे वेस्ट इंडिजला जमले नाही ते झिम्बाब्वेने करून दाखवले

## स्कॉटलंडचा पाच गडी राखून पराभव

अहमदाबाद ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था




आयसीसी टी२० विश्वचषक स्पर्धेत ब गटातील शेवटच्या सामन्यात झिम्बाब्वेने स्कॉटलंडवर पाच गडी राखून मात केली. यासह त्याने स्पर्धेच्या सुपर-१२ मध्ये आपले स्थान निश्चित केले. होबार्टमधील बेलेरिव्ह ओव्हल येथे खेळल्या गेलेल्या या सामन्यात स्कॉटलंडने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. स्कॉटलंडने २० षटकांत ६ बाद १३२ धावा केल्या. झिम्बाब्वेने १८.३ षटकांत ५ बाद १३३ धावा करून सामना जिंकला. झिम्बाब्वेचा हा पाचवा टी२० विश्वचषक असून याआधी त्यांना ४ पैकी एकदाही पात्रता फेरीच्या पुढे प्रगती करता आली नव्हती. झिम्बाब्वेने स्कॉटलंडला हरवत सुपर-१२ साठी आपण पात्र आहोत हे सिद्ध केले.

टी२० विश्वचषक २०२२ मध्ये ग्रुप बी मधून सुपर-१२ मध्ये पोहोचणारा झिम्बाब्वे हा दुसरा संघ आहे. त्याआधी आयर्लंड ब गटातून सुपर-१२ साठी पात्र ठरला आहे. त्याच मैदानावर खेळल्या गेलेल्या सामन्यात त्याने दोन वेळा टी२० विश्वचषक विजेत्या वेस्ट इंडिजचा ९ गडी राखून पराभव केला. झिम्बाब्वेकडून कर्णधार क्रेग एर्विनने सर्वाधिक ५८ धावा केल्या. त्याने ५४ चेंडूंच्या खेळीत ६ चौकार मारले. सिकंदर रझाने २३ चेंडूत ४० धावांची तुफानी खेळी केली. त्याने ३ चौकार आणि २ षटकार मारले. तेच २ षटकार सामन्यादरम्यान मारले गेले. सिकंदर रझाला सामनावीर म्हणून गौरवण्यात आले. याआधी स्कॉटलंडकडून जॉर्ज मुनसेने सर्वाधिक ५४ धावा केल्या. मात्र, यासाठी त्याने ५१ चेंडू घेतले. झिम्बाब्वेच्या गोलंदाजांनी इतकी तगडी गोलंदाजी केली की स्कॉटलंडच्या एकाही फलंदाजाला षटकार मारता आला नाही. झिम्बाब्वेच्या तेंडाई चत्राने ४ षटकात १४ धावा देत २ गडी बाद केले. सिकंदर रझाने ४ षटकात २० धावा देत १ बळी घेतला. रिचर्ड नागरवाने ४ षटकात २८ धावा देत २ बळी घेतले.

## युझवेंद्र चहलला सपोर्ट करण्यासाठी धनश्री वर्मा पोहोचली ऑस्ट्रेलियात

### 'ये वर्ल्ड कप हमारा है घर लेकर आ...'

।ओडेन्से।
महाईन्यूज । वृत्तसंस्था



भारतीय संघ सध्या ऑस्ट्रेलियात होणाऱ्या टी२० विश्वचषक २०२२ च्या तयारीसाठी चांगलाच घाम गाळत आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली पहिली आयसीसी स्पर्धा खेळणारी टीम इंडिया या मेगा स्पर्धेत २३ ऑक्टोबरला पाकिस्तानविरुद्धच्या मोहिमेला सुरुवात करेल. या हाय-व्होल्टेज सामन्यासाठी भारतीय चाहत्यांसह खेळाडूंचे कुटुंबीयही खूप उत्सुक आहेत. अशात आता युझवेंद्र चहलला पाठिंबा देण्यासाठी त्याची पत्नी धनश्री वर्मा मेलबर्नला पोहोचली आहे.या अगोदर ही बऱ्याच खेळाडूंच्या पत्नी आपल्या पतींना सपोर्ट करण्यासाठी ऑस्ट्रेलियात पोहोचल्या आहेत. यामध्ये सूर्यकुमार यादवच्या पत्नीचा देखील समावेश आहे. तसेच आता धनश्री वर्माने देखील आपण ऑस्ट्रेलियात पोहचल्याचे,इंस्टाग्रामवर काही फोटो शेअर करून माहिती दिली आहे. धनश्रीने काही दिवसांपूर्वी टी२० वर्ल्ड कपमध्ये टीम इंडियाला सपोर्ट करण्यासाठी एक व्हिडिओही शेअर केला होता. गुडघ्याच्या शस्त्रक्रियेनंतर धनश्री नाचत नसून भारताला सपोर्ट करण्यासाठी तिने बसून हा व्हिडिओ बनवला आहे.

या व्हिडिओमध्ये धनश्री 'बल्ला चला, छक्का लगा... ये कप हमारा है घर लेकर आ...' गाताना दिसत आहे.काही काळापूर्वी धनश्रीला डान्स करताना दुखापत झाली होती. त्यानंतर तिच्यावर पायावर मोठी शस्त्रक्रियाही झाली होती. मेलबर्नला पोहोचल्यानंतर धनश्रीने शेअर केलेल्या फोटोंमध्ये तिने गुडघ्यावर कॅप घातल्याचे दिसत आहे.

### टी20 विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय संघ:

रोहित शर्मा (कर्णधार), केएल राहुल (उपकर्णधार), विराट कोहली, सूर्यकुमार यादव, दीपक हुडा, ऋषभ पंत (यष्टीरक्षक), दिनेश कार्तिक (यष्टीरक्षक), हार्दिक पंड्या, आर. अश्विन, युझवेंद्र चहल, अक्षर पटेल, भुवनेश्वर कुमार, हर्षल पटेल, अर्शदीप सिंग आणि मोहम्मद शमी.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही